# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**

**सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**सोमवार, दिनांक १६ मार्च, २०२६**

## ग्रामविकास विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ३०**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: एल-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५३, जिल्हा प्रशासन**<br>**रूपये:- १,११,४०,९५,०८,०००/-**<br>**श्री. हारुन खान** |
| (१) | १२०८ | १०० | पुणे जिल्हयातील खेड तालुक्यातील मौजे जऊळके खुर्द ते वाफगांव रोड (ठाकरवाडी मार्गे ) गट क्रमांक ६८१ मधून साधारणपणे ३ किमी जात असून सदर मार्ग झाल्यास शेतकरी व ग्रामस्थांना वेळ वाचून अत्यंत सोईस्कर होणार असून ग्रामपंचायतीने तसा ठरावही संमत करणे, परंतु अद्यापही सदरचा मार्ग होत नसल्याने ग्रामस्थांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२) | १२१० | १०० | मौजे जऊळके, ता.खेड,जि. पुणे या गावातील खारदरा वस्ती डांबरीकरण वा काँक्रिटीकरण करण्याकरिता तत्कालिन सरपंचाने वारंवार स्थानिक प्रशासनाकडे मागणी करुन याकरिता निधीची तरतूद करण्यात आलेली नसल्याने ग्रामस्थांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (३) | १४९६ | १० | सांगोला तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब झाली असून त्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणावर गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. विशेषतः प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत येणारे अनेक रस्ते खराब अवस्थेत असून तातडीने दुरुस्तीची आवश्यकता आहे. सांगोला तालुक्यातील ग्रामीण मार्ग क्र. २८७ बागलवाडी – काकडे वस्ती रस्ता, ग्रामीण मार्ग क्र. २९५ सांगोला – सोनंद वाडी रस्ता, तसेच राष्ट्रीय मार्ग क्र. ३८६ सांगली जिल्हा हद्द ते एखतपूर रस्ता आणि ग्रामीण मार्ग क्र. ११२ चांगलवाडी ते शेंबडे वस्ती रस्ता हे मार्ग सध्या अतिशय खराब स्थितीत आहेत. या रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले असून वाहतुकीस अडथळे निर्माण होत आहेत. त्यामुळे शेतकरी, विद्यार्थी, रुग्णवाहिका व सामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आहे. वरील सर्व रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करून दर्जेदार काम करण्यासाठी आवश्यक त्या निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४) | १४९७ | १० | अलिबाग तालुक्यातील डोंगराळ व आदिवासी भागातील अनेक वाड्या आजही मूलभूत रस्ते सुविधांपासून वंचित आहेत. विशेषतः सागरगड माची येथील आदिवासी वाडी तसेच बसली येथील आदिवासी वाडी येथे जाण्यासाठी सध्या व्यवस्थित रस्ता उपलब्ध नसल्यामुळे स्थानिक नागरिकांना दळणवळणाच्या गंभीर अडचणींचा सामना करावा लागत आहे. पावसाळ्याच्या काळात या भागातील परिस्थिती अधिक बिकट होत असून विद्यार्थी, रुग्ण, शेतकरी तसेच महिलांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागतो. या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत सागरगड माची आदिवासी वाडीकडे जाणारा रस्ता तसेच बसणी आदिवासी वाडीकडे जाणारा रस्ता तातडीने तयार करणे अत्यंत आवश्यक आहे. या रस्त्यांमुळे आदिवासी बांधवांना शिक्षण, आरोग्य सेवा आणि बाजारपेठेशी संपर्क सुलभ होणार आहे. म्हणूनच वरील दोन्ही रस्त्यांच्या बांधकामासाठी आवश्यक त्या निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एल-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५९, सार्वजनिक बांधकामे**<br>**रूपये:- १,००,००,००,०००/-**<br>**श्री. हेमंत ओगले** |
| (५) | १५३१ | १० | श्रीरामपूर राहुरी विधानसभा मतदारसंघातील सर्व ग्रामीण मार्ग यांची अतिशय दुरावस्था झालेली असणे, खराब रस्त्यांमुळे श्रीरामपूर व राहुरी तालुक्यातील आबालवृद्ध नागरिक, विद्यार्थी, गर्भवती महिला, रुग्ण यांना प्रवास करताना रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे अतिशय त्रास होत असणे, रस्त्यांच्या दुरावस्थेमुळे अवजड वाहतूक आणि नागरिकांची दुचाकी, चारचाकी वाहने यांना वाहन चालवताना खूप कसरत करावी लागणे, रस्त्यांच्या दुरावस्थेमुळे वारंवार अपघात होत असणे, या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याची असलेली आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (६) | १५१३ | १० | उमरेड विधानसभा मतदारसंघातील विविध पंचायत समिती अंतर्गत अनेक मूलभूत विकास कामे प्रलंबित आहेत. ग्रामीण भागात रस्ते दुरुस्ती, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, गटार बांधकाम, सार्वजनिक सुविधा तसेच इतर पायाभूत सुविधा |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | उभारण्यासाठी निधीची अत्यंत गरज आहे.परंतु सद्यस्थितीत पंचायत समितींना पुरेसा निधी उपलब्ध होत नसल्यामुळे अनेक महत्त्वाची विकासकामे रखडलेली आहेत. त्यामुळे स्थानिक नागरिकांना मोठ्या प्रमाणात अडचणींचा सामना करावा लागत आहे.त्यामुळे चालू विधिमंडळाच्या अधिवेशनात शासनाने या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देऊन उमरेड विधानसभा मतदारसंघातील पंचायत समितींना विशेष निधी तातडीने उपलब्ध करून द्यावा, तसेच प्रलंबित विकास कामांसाठी आवश्यक ती तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एल-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २५०५, ग्रामीण रोजगार**<br>**रूपये:- १,०७,५०,००,००,०००/-**<br>**श्री. बापूसाहेब पठारे** |
| (७) | १४६५ | १० | पुणे शहर व परिसरात नागरीकरण मोठ्या प्रमाणात वाढले असून जमिनीचे दर प्रचंड वाढलेले आहेत. त्यामुळे घरकुल योजनेअंतर्गत जमीन खरेदी करण्यासाठी शासनाकडून देण्यात येणारे आर्थिक सहाय्य सध्याच्या बाजारभावाच्या तुलनेत अत्यंत अपुरे ठरत आहे. परिणामी लाभार्थ्यांना उर्वरित रक्कम भरणे शक्य होत नाही आणि अनेक पात्र नागरिकांना घरकुल योजनेचा लाभ घेण्यास अडचणी येत आहेत. या पार्श्वभूमीवर पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल योजनेअंतर्गत जमीन खरेदीसाठी देण्यात येणारे आर्थिक सहाय्य वाढविणे अत्यावश्यक आहे. याकरिता शासनाने तातडीने आवश्यक निर्णय घेऊन आर्थिक सहाय्यात वाढ करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एल-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २५१५, इतर ग्रामीण विकास कार्यक्रम**<br>**रूपये:- ७४,५२,३१,५०,०००/-**<br>**श्री. अजय चौधरी** |
| (८) | १३९५ | १०० | कुडाळ तालुक्यातील ( जि.सिंधुदुर्ग ) येथील रतांबे – केगद व अनवणेवाडी या रस्त्यावर स्ट्रिट लाईट नसल्याने तेथील नागरिकांना रात्री-अपरात्री फिरणे अडचणीचे होते. याकरिता या रस्त्यावर स्ट्रीट लाईट लावण्याची मागणी वारंवार सरपंच व ग्रामस्थांनी प्रशासनाकडून करण्यात येऊनही कोणतीच कार्यवाही न करणे, याकरिता शासनाने या रस्त्यावर स्ट्रीट लाईट लावण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (९) | १५०६ | १० | अलिबाग तालुक्यातील वरसोली येथील श्री खंडोबा मंदिर, कार्ले येथील शिव मंदिर, नागाव येथील महादेव मंदिर, मापगाव येथील कणकेश्वर मंदिर तसेच चौल येथील रामेश्वर मंदिर ही अत्यंत प्राचीन व ऐतिहासिक धार्मिक स्थळे आहेत. या ठिकाणी दरवर्षी मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होत असून विशेषतः महाशिवरात्री तसेच इतर यात्रांच्या काळात हजारो भाविक येथे दर्शनासाठी येत असतात. मात्र या यात्रा स्थळांच्या परिसरात मूलभूत सुविधांचा अभाव दिसून येतो. रस्ते, पिण्याचे पाणी, स्वच्छता, पार्किंग व्यवस्था तसेच भाविकांसाठी आवश्यक इतर सुविधा अपुऱ्या असल्यामुळे भाविकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. या पार्श्वभूमीवर अलिबाग तालुक्यातील धार्मिक व ऐतिहासिक यात्रा स्थळांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आवश्यक त्या निधीची तरतूद करून मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१०) | १५०९ | १० | सांगोला तालुक्यातील अजनाळे येथील श्री खंडोबा मंदिर, कमलापूर येथील यल्लमा देवी मंदिर तसेच जवळा येथील म्हसोबा मंदिर ही ऐतिहासिक व श्रद्धास्थान असलेली धार्मिक स्थळे आहेत. या मंदिरांमध्ये दरवर्षी मोठ्या प्रमाणावर यात्रा भरत असून या यात्रांसाठी लाखो भाविक दर्शनासाठी येत असतात. मात्र या ठिकाणी येणाऱ्या भाविकांसाठी आवश्यक त्या मूलभूत पायाभूत सुविधा जसे की रस्ते, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहे, पार्किंग व्यवस्था तसेच इतर सोयीसुविधा अपुऱ्या असल्याचे दिसून येते. त्यामुळे यात्रेच्या काळात भाविकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. या पार्श्वभूमीवर सांगोला तालुक्यातील अजनाळे, कमलापूर व जवळा येथील या ऐतिहासिक मंदिर परिसरांचा विकास करून भाविकांसाठी आवश्यक त्या मूलभूत पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने आवश्यक त्या निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (११) | १५१० | १० | सांगोला तालुक्यातील बुद्धेहाळ, राजुरी, नागरे व नराळे या ग्रामपंचायतींनी मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधकाम योजना अंतर्गत ग्रामपंचायत इमारत बांधकामासाठी राज्य शासनाकडे प्रस्ताव सादर केलेले आहेत. ग्रामपंचायत कार्यालय ही ग्रामीण प्रशासनाची अत्यंत महत्त्वाची कडी असून ग्रामस्थांना विविध शासकीय योजना व सेवा उपलब्ध करून देण्यासाठी स्वतंत्र व सुसज्ज इमारतीची आवश्यकता आहे. या पार्श्वभूमीवर सांगोला तालुक्यातील बुद्ध्याहाळ, राजुरी, नागरे व नराळे ग्रामपंचायतींनी सादर केलेल्या प्रस्तावांना तातडीने मंजुरी देऊन मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधकाम योजना अंतर्गत आवश्यक त्या निधीची तरतूद करून ग्रामपंचायत इमारतींचे बांधकाम हाती घेण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१२) | १५११ | १० | सांगोला तालुक्यातील अजनाळे, चिंचोली, देवळे, शिरभावी तसेच बुरुंगेवाडी या ग्रामपंचायतींना नवीन ग्रामपंचायत कार्यालय इमारतींची आवश्यकता आहे. सध्या अनेक ठिकाणी ग्रामपंचायत कार्यालये जीर्ण अवस्थेत असून काही ठिकाणी अपुऱ्या जागेमुळे ग्रामपंचायतीचे कामकाज सुरळीतपणे पार पाडणे कठीण होत आहे. त्यामुळे ग्रामस्थांना विविध शासकीय सेवा मिळविताना गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. ग्रामपंचायत ही ग्रामीण प्रशासनाची अत्यंत महत्त्वाची यंत्रणा असून तिचे कामकाज व्यवस्थित पार पडण्यासाठी सुसज्ज व प्रशस्त इमारत असणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधकाम योजनेअंतर्गत अजनाळे, चिंचोली, देवळे, शिरभावी व बुरुंगेवाडी ग्रामपंचायतींसाठी नवीन कार्यालय इमारती बांधण्यासाठी आवश्यक त्या निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. बापूसाहेब पठारे** |
| (१३) | १४६७ | १० | पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील क वर्ग तीर्थक्षेत्र वाडे बोल्हाई येथे दररोज मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येत असतात. मात्र या ठिकाणी भाविकांसाठी आवश्यक असलेल्या प्राथमिक सुविधांचा अभाव दिसून येतो. मंदिर परिसराचे सुशोभीकरण, स्वच्छता व्यवस्था, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह तसेच भाविकांच्या सोयीसाठी इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे अत्यावश्यक आहे. तसेच वाडे बोल्हाई येथे येणाऱ्या पालखी व भाविकांच्या दृष्टीने पालखी मार्गाचे नियोजनबद्ध विकास करणे, पायवाट व रस्त्यांची सुधारणा करणे आवश्यक आहे. यामुळे भाविकांना सुरक्षित व सोयीस्कर दर्शन व्यवस्था उपलब्ध होईल आणि धार्मिक पर्यटनालाही चालना मिळेल. याबाबत आवश्यक निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (१४) | १५१२ | १० | स्थानिक लोकप्रतिनिधींच्या उमरेड विधानसभा मतदारसंघातील नागरिकांच्या वतीने हे नमूद करू इच्छितो की, सदर मतदारसंघात अनेक मूलभूत विकास कामे प्रलंबित आहेत. रस्ते, गटारे, पिण्याचे पाणी, सार्वजनिक सुविधा आदी कामांसाठी मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता आहे.परंतु २५–१५ निधी अंतर्गत उमरेड विधानसभा मतदारसंघाला अपेक्षित प्रमाणात निधी उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे अनेक महत्त्वाची कामे रखडलेली आहेत आणि नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.म्हणूनच या बाबीकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन उमरेड विधानसभा मतदारसंघासाठी २५–१५ निधी वाढवून देण्यात यावा, तसेच प्रलंबित विकास कामांसाठी तातडीने निधी मंजूर करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: एल-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३०५४, मार्ग व पूल**<br>**रूपये:- १०,०४,१४,००,०००/-**<br>**श्री. अजय चौधरी** |
| (१५) | १३९२ | १०० | कुडाळ तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) आंब्रड रतांबेवाडी मुख्य रस्ता ते केमदवाडी अनवणे वाडी ते पोखरण सिमा-ओहोळ पर्यतचा रस्ता सुमारे २० ते २५ वर्षापूर्वी केलेला असून त्यापासून आजपावेतो या रस्त्यांची डागडुजी केलेली नसणे, तसेच सदरच्या ओळोळवरील ब्रिज-मोरीची खूपच वाईट अवस्था असून पावसाळयात ग्रामस्थांचे खूप हाल होणे, या रस्त्यांची दुरुस्ती करण्याकरिता वारंवार प्रशासनाकडे सरपंच व ग्रामस्थांनी करुनही कोणतीच कार्यवाही न होणे, या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (१६) | १५०३ | १० | सांगोला तालुक्यातील कडलास, वाटंबरे, अकोला, राजुरी, वासुद ही गावे मान नदीच्या काठावर वसलेली असून गेल्या वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे मान नदीला मोठ्या प्रमाणावर पूरस्थिती निर्माण झाली होती. या पूर सदृश्य परिस्थितीमुळे परिसरातील अनेक रस्ते व पूल मोठ्या प्रमाणावर खराब झाले आहेत. पूरामुळे रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले असून काही ठिकाणी रस्त्यांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे या गावांतील नागरिक, शेतकरी, विद्यार्थी तसेच रुग्णवाहिका यांना दळणवळण करताना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. विशेषतः पावसाळ्याच्या काळात ही परिस्थिती अधिक गंभीर बनते. या पार्श्वभूमीवर सांगोला तालुक्यातील अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे खराब झालेल्या रस्ते व पुलांची तातडीने दुरुस्ती करून त्यासाठी आवश्यक त्या निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. बापूसाहेब पठारे** |
| (१७) | १४६९ | १० | पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील वडगाव शिंदे ते निरगुडी या दोन गावांना जोडणारा ग्रामीण मार्ग सध्या उपलब्ध नाही. सदर मार्ग विकसित झाल्यास दोन्ही गावे थेट एकमेकांशी जोडली जातील. तसेच सध्या नागरिकांना या दोन गावांदरम्यान प्रवास करण्यासाठी सुमारे २० किलोमीटरचा फेरा मारावा लागतो. सदर ग्रामीण मार्ग निर्माण झाल्यास हे अंतर कमी होऊन केवळ सुमारे ४ किलोमीटर इतके राहील, ज्यामुळे स्थानिक नागरिकांचा वेळ व इंधनाची बचत होईल तसेच दळणवळण सुलभ होईल. त्यामुळे वडगाव शिंदे ते निरगुडी हा ग्रामीण मार्ग विकसित करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (१८) | १५१६ | १० | उमरेड विधानसभा मतदारसंघातील भिवापूर तालुका, कुही तालुका आणि उमरेड तालुका मध्ये रस्ते, पूल आणि डांबरीकरणाचे कामे प्रलंबित आहेत. पावसाळ्यात रस्त्यांची अवस्था अत्यंत बिकट होते, पुले वाहतुकीस अडथळा आणतात आणि गावातील नागरिक व विद्यार्थी तसेच रुग्ण वैद्यकीय सुविधांकडे जाण्यास त्रास घेतात. सदर कामे त्वरित सुरू करण्यासाठी शासनाने ग्रामविकास खात्याच्या ३०–५४ योजनेअंतर्गत या तालुक्यांना प्राधान्याने निधी मंजूर करून देणे अत्यंत आवश्यक आहे, वरील कारणास्तव, मी या बाबतीत अर्थसंकल्पाच्या चर्चेत कपात सूचना मांडत आहे आणि शासनाकडे नम्र विनंती करतो की या निधीची तातडीने तरतूद करून विकासकामे सुरळीत पार पाडण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (१९) | १३१६ | १० | मौजे बोरगांव ग्रुप ग्रामपंचायत (तालुका-पेण, जिल्हा-रायगड) येथील खवसावाडी, काजुचीवाडी, केळीचीवाडी, तांबडी आणि उंबरमाळवाडी या पांचही आदिवासी वाडयांच्या मूलभूत सुविधांसाठी या गावातील ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेने मागील दहा वर्षापासून सातत्याने मा.जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे रस्त्यासाठी पाठपुरावा करुनही अद्यापर्यन्त रस्त्याचे काम सुरु केले नसल्याने जवळपास ५ – ६ कि.मी.अंतर पेण-सुधागड तालुक्याच्या ठिकाणी पायवाटेने चालत जावे लागणे, या पांचही आदिवासी वाड्यांच्या रस्त्यासाठी जानेवारी, २०२४ च्या सुमारास मे.सिध्दिविनायक कंन्स्ट्रक्शन ठेकेदाराला ७ कोटी ६० लाख रुपयांचा निधी मंजूर करुनही अद्यापपर्यन्त रस्त्याच्या कामास सुरुवात झालेली नाही. मागील दोन वर्षात रायगड जिल्हाधिकारी कार्यालयासह संबंधित सर्व विभाग कार्यालयांवर मोर्चे आंदोलने काढून या भागातील आदिवासींच्या वाट्याला आलेला विकास निधी रायगड जिल्हापरिषद, पेण उपविभागाचे अभियंता आणि ठेकेदारांनी गिळंकृत केला असून याबाबत माहितीच्या अधिकारात माहिती मागवली असता तीही उपलब्ध करुन न देणे, जि.प.रत्नागिरी सा.बा.विभागाने मौजे चिंभावे ग्रामपंचायत हद्दीमधील धनगरवाडीत जाण्या-येण्यासाठी रस्ता तयार करुन देण्याच्या कामाकडे सातत्याने दुर्लक्ष करीत असल्याने या भागातील नागरीकांमध्ये पसरलेली तिव्र् असंतोष, संतापाची लाट. मौजे बोरगांव (तालुका-पेण, जिल्हा-रायगड) ग्रामपंचायत हद्दीमध्ये खवसावाडी, काजुचीवाडी, केळीचीवाडी, तांबडी आणि उंबरमाळवाडी या पांचही आदिवासी पाडयातील अंदाजे ४५० लोकवस्ती असलेल्या आदिवासींच्या पाडयात जाण्या-येण्यासाठी ६ कि.मी.चा रस्ता तयार करुन देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (२०) | १३१७ | १० | मौजे चिंभावे (तालुका-महाड, जिल्हा-रत्नागिरी) ग्रामपंचायत हद्दीमध्ये धनगर समाजातील अंदाजे २५० लोकवस्ती असलेल्या धनगरवाडीत जाण्या-येण्यासाठी देशाला स्वातंत्र्य मिळून ७७ वर्षे झाल्यानंतर आजही रस्ता नसल्याने जवळपास ६ कि.मी अंतर टेकडीवर पायवाटेने चालत जावे लागणे, गावातील दिपेश विठ्ठल माने यांचे १२ ऑगस्ट, २०२४ रोजी ठाणे जिल्ह्यातील मानपाडा येथे अकस्मात निधन झाले. त्यांचा मृतदेह अंत्यसंस्कारसाठी गावी आणण्यात आला. मात्र गावात जायला रस्ताच नसल्याने मृतदेह काठीला चादर बांधून डोली तयार करण्यात आली व त्यातून मृतदेह नेण्यात आला. हीच परिस्थिस्ती गावातील आजारी, गरोदर महिला, अबालवृध्द आजारी पडल्यास त्यांना डोली करुन किंवा झोळीतून औषधोपचारासाठी शहराच्या ठिकाणी नेण्यात येते. जि.प.रत्नागिरी सा.बा.विभागाने मौजे चिंभावे ग्रामपंचायत हद्दीमधील धनगरवाडीत जाण्या-येण्यासाठी रस्ता तयार करुन देण्याच्या कामाकडे सातत्याने दुर्लक्ष करीत असल्याने या भागातील नागरीकांमध्ये पसरलेली तिव्र् असंतोष, संतापाची लाट. मौजे चिंभावे (तालुका-महाड, जिल्हा-रत्नागिरी) ग्रामपंचायत हद्दीमध्ये धनगर समाजातील अंदाजे २५० लोकवस्ती असलेल्या धनगरवाडीत जाण्या-येण्यासाठी ६ कि.मी.चा रस्ता तयार करुन देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२१) | १३१८ | १० | कळंबस्ते, मोहल्ला पोष्ट ऑफिस (ता.संगमेश्वर, जि.रत्नागरी) ते कब्रस्तान दर्ग्याकडे जाणाऱ्या रस्त्याची अवस्था दयनीय झाली असणे, हा रस्ता वाहतुकीस अयोग्य झाली असणे, या रस्त्याचे सिमेंट कॉक्रिटीकरण करण्याची झालेली आवश्यकता लक्षात घेता शासनाने १७ लक्ष इतक्या रकमेच्या कामास दि.२९/९/२०२५ दरम्यान मंजूरी देणे, मात्र मोठा कालावधी उलटूनही अद्याप काम सुरु न होणे, त्यामुळे स्थानिक ग्रामस्थांत व्यक्त होणारा असंतोष, याबाबत शासनाने या रस्त्याच्या कॉक्रिटीकरण करण्याच्या दृष्टीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| (२२) | १३१९ | १० | मौजे वाकण (खांबेश्वरवाडी-रोहिदासवाडी) (तालुका-पोलादपूर, जिल्हा-रायगड) या ३.५ कि.मी.वाडीजोड रस्त्याचे मजबूतीकरणासह डांबरीकरण करुन संपूर्ण मार्गावर संरक्षण भिंत बांधून देण्यासाठी या भागातील ग्रामस्थांनी ऑगस्ट, २०२२ अखेर व तत्पूर्वी मा.मुख्यमंत्री, मा.ग्रामविकास मंत्री, मा.उपसभापती,महाराष्ट्र विधानपरिषद, मा.जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे निवेदने देवूनही शासकीय दिरंगाईमुळे वाडीजोड रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असणे, सद्य:स्थितीत प्रकरण ग्रामविकास विभागाच्या CR ६८२/Yojna-६ कडे प्रलंबित असणे, मौजे वाकण हे गांवच्या वाडीवस्त्या उंच डोंगरपायथ्याशी वसलेल्या असल्याने जोरदार अतिवृष्टीत वादळ वाऱ्याने डोंगरकडा कोसळून गांव जमिनीत गाडले जाण्याची भिती असल्याने गावकरी जीव मूठीत धरुन चिंता विवंचनेत जीवन जगत आहेत, असल्याने ग्रामस्थांमध्ये पसरलेली तीव्र नाराजी, संतापाची भावना, त्यांच्या सहनशिलतेचा |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | उद्रेक होवून वेळप्रसंगी अप्रिय घटना घडण्याची निर्माण झालेली शक्यता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२३) | १४७१ | १० | मौजे शिवडाव (तालुका-कणकवली, जिल्हा-सिंधुदूर्ग) गावातील हत्तीचे पाऊल ते बौध्दवाडी समाजमंदिर या १.२० कि.मी. लांबीचा रस्ता सन २०२३, २०२४, २०२५ मध्ये झालेल्या जोरदार अतिवृष्टीने रस्त्यात खड्डे पडलेले असून रस्त्याने या भागातील ग्रामस्थांना येणे-जाणे, वाहन चालवणे धोकादायक झालेले आहे. रस्ता यापूर्वी डांबरीकरण करुनही जोरदार पावसामुळे वारंवार ना-दुरुस्त होतो. सदर रस्त्याने ग्रामस्थांना जा-ये करणे खूपच गैरसोयीचे झालेले आहे. सदर रस्ता भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेअंतर्गत सिमेंट काँक्रीटचा करुन देण्यासाठी ग्रामपंचायत, शिवडाव यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, सिधुदूर्ग जिल्हापरिषद (ग्रामपंचायत विभाग) यांचेकडे ऑक्टोबर, २०२४ अखेर प्रस्ताव सादर केलेला आहे. परंतु अद्यापपर्यन्त शिवडाव-हत्तीचे पाऊल ते बौध्दवाडी समाजमंदिर रस्त्याचे काँक्रीटीकरण झालेले नसणे, सबब, शिवडाव गावातील हत्तीचे पाऊल ते बौध्दवाडी समाजमंदिर या रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करुन देण्यासाठी जिल्हापरिषद, सिंधुदूर्ग यांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करुन देवून संपूर्ण १.२० कि.मी. रस्त्याचे काँक्रीटीकरण करुन देण्यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२४) | १४७२ | १० | सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली तालुक्यातील ग्रामपंचायत दिगवळे हद्दीतील करंबळीवाडी नाटे येथून श्री. उल्हास दत्तात्रय कुलकर्णी यांच्या घरापर्यंत जाणारा रस्ता अत्यंत खराब अवस्थेत असून सध्या कच्चा असणे, पावसाळ्यात चिखल व पाणी साचल्यामुळे ग्रामस्थ, शालेय विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या प्रमाणावर अडचणींचा सामना करावा लागत असणे, सदर रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्याबाबतचा प्रस्ताव सन २०२५-२६ च्या योजनेअंतर्गत ग्रामपंचायतीमार्फत सादर करण्यात आलेला असून तो मान्यतेसाठी प्रलंबित असणे, या रस्त्याच्या दुरुस्ती व मजबुतीकरणासाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत तातडीने प्रशासकीय मान्यता व आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२५) | १४७७ | १० | मौजे केळवली प्राथमिक शाळा, सालपे क्रमांक-२ ते केळवली गवळीवाडी भालेकर घर ते गोठण रस्ता (तालुका-राजापूर, जिल्हा-रत्नागिरी) या रस्त्याचे मुजबूतीकरणासह डांबरीकरण करुन देण्यासाठी या भागातील ग्रामस्थांनी (१) मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री/राज्यमंत्री, (२) मा.ग्रामविकास मंत्री, (३) मा.पालकमंत्री, रत्नागिरी (४) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, रत्नागिरी तसेच, (५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, रत्नागिरी यांचेकडे |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | माहे ऑक्टोबर, २०२३ पासून व तत्पूर्वी प्रत्यक्ष भेटून तसेच वारंवार अर्ज/निवेदने देवून रस्त्याचे डांबरीकरण करुन देण्यासाठी विनंती करणे, मौजे केळवली प्राथमिक शाळा, सालपे क्रमांक-२ - केळवली गवळीवाडी भालेकर घर ते गोठण या रस्त्यावर सन २०२३, २०२४, २०२५ या वर्षी पडलेल्या जोरदार पावसाने रस्त्यात खड्डे पडल्याने रस्ता वाहतुकीस अयोग्य, ग्रामस्थांना येण्या-जाण्यासाठी धोकादायक झाला आहे. सदरचा रस्ता हा ग्रामीण मार्ग असल्यामुळे शासकीय अधिकाऱ्यांचे सातत्याने होत असलेले दुर्लक्ष, मौजे केळवली प्राथमिक शाळा, सालपे क्रमांक-२ - केळवली गवळीवाडी भालेकर घर ते गोठण या रस्त्याच्या डांबरीकरणासाठी शासनाकडे वारंवार पाठपुरावा करुनही रस्त्याचे डांबरीकरणाचे काम शासन हाती घेत नसल्याने गावातील ग्रामस्थांमध्ये शासनाच्या निष्क्रीयतेमुळे पसरलेला तीव्र असंतोष, त्यांच्यामध्ये निर्माण झालेली, पसरलेली तीव्र संतापाची लाट, मौजे केळवली प्राथमिक शाळा, सालपे क्रमांक-२ - केळवली गवळीवाडी भालेकर घर ते गोठण या रस्त्याच्या डांबरीकरणासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एल-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४५१५, इतर ग्रामविकास कार्यक्रम यावरील भांडवली खर्च**<br>**रूपये:- १,००,००,००,०००/-**<br>**श्री. बापूसाहेब पठारे** |
| (२६) | १४५८ | १० | वडगाव शेरी मतदारसंघातील निरगुडी, (ता.हवेली, जि.पुणे) हे गाव पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीलगत असून या परिसरात मोठ्या प्रमाणात शहरीकरण होत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे महिलांच्या स्वयं सहाय्यता समूहांनी तयार केलेल्या विविध वस्तू व उत्पादनांना स्थिर व हक्काची बाजारपेठ उपलब्ध होणे अत्यंत आवश्यक आहे. सदर गावामध्ये महिला स्वयं सहाय्यता समूहांच्या वस्तू व उत्पादनांच्या विक्रीसाठी उमेद मॉल / जिल्हा विक्री केंद्र उभारण्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध आहे. त्यामुळे या ठिकाणी "उमेद मॉल" उभारणीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देऊन महिलांच्या स्वयं सहाय्यता समूहांना विक्रीची सुसज्ज बाजारपेठ निर्माण करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२७) | १४५९ | १० | वडगाव शिंदे, (ता. हवेली, जि. पुणे) हे गाव पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीलगत असून या परिसरात मोठ्या प्रमाणात शहरीकरण होत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे महिलांच्या स्वयं सहाय्यता समूहांनी तयार केलेल्या विविध वस्तू व उत्पादनांना स्थिर व हक्काची बाजारपेठ उपलब्ध होणे अत्यंत आवश्यक आहे. सदर गावामध्ये महिला स्वयं सहाय्यता समूहांच्या वस्तू व उत्पादनांच्या विक्रीसाठी उमेद मॉल / जिल्हा विक्री केंद्र उभारण्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध आहे. त्यामुळे या ठिकाणी "उमेद मॉल" उभारणीसाठी आवश्यक |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | निधी उपलब्ध करून देऊन महिलांच्या स्वयं सहाय्यता समूहांना विक्रीची सुसज्ज बाजारपेठ निर्माण करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२८) | १४६० | १० | ता. हवेली, जि. पुणे येथील मांजरी खुर्द हे गाव पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीलगत असून या परिसरात मोठ्या प्रमाणात शहरीकरण होत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे महिलांच्या स्वयं सहाय्यता समूहांनी तयार केलेल्या विविध वस्तू व उत्पादनांना स्थिर व हक्काची बाजारपेठ उपलब्ध होणे अत्यंत आवश्यक आहे. सदर गावामध्ये महिला स्वयं सहाय्यता समूहांच्या वस्तू व उत्पादनांच्या विक्रीसाठी उमेद मॉल / जिल्हा विक्री केंद्र उभारण्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध आहे. त्यामुळे या ठिकाणी "उमेद मॉल" उभारणीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देऊन महिलांच्या स्वयं सहाय्यता समूहांना विक्रीची सुसज्ज बाजारपेठ निर्माण करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एल-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ५०५४, मार्ग व पूल यांवरील भांडवली खर्च**<br>**रूपये:- ६३,२७,००,००,०००/-**<br>**डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (२९) | १४९८ | १० | सांगोला तालुक्यातील अनेक गावांमधील दळणवळणाची सुविधा अपुरी असून विशेषतः माण नदीवरील पूल नसल्यामुळे स्थानिक नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पावसाळ्याच्या काळात नदीला पूर येत असल्यामुळे अनेक गावांचा संपर्क पूर्णपणे तुटतो. त्यामुळे शेतकरी, विद्यार्थी, रुग्णवाहिका तसेच सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या प्रमाणावर गैरसोयी सहन कराव्या लागतात. मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत प्रजिमा क्र. १६३ मेथवडे ते देवळे मार्गावरील माण नदीवर पूल बांधणे, तसेच ग्रामीण मार्ग क्र. २९ नाझरे येथील माण नदीवरील पूल बांधणे अत्यंत आवश्यक आहे. या पुलांचे बांधकाम झाल्यास उदनवाडी ते महूद परिसरातील अनेक गावांना दळणवळणासाठी मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे. तसेच प्रजिमा क्र. ७४ मांजरी ते सावे मार्गावरील माण नदीवर पूल बांधणे हे देखील अत्यंत महत्त्वाचे काम असून या पुलामुळे परिसरातील गावांचा संपर्क सुलभ होऊन वाहतुकीची सुविधा करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. बापूसाहेब पठारे** |
| (३०) | १४६१ | १० | वडगाव शेरी मतदारसंघातील इतर जिल्हा मार्ग क्रमांक १२६ (लोहगाव–निरगुडी रस्ता) हा श्री क्षेत्र लोहगाव व श्री क्षेत्र आळंदी या महत्त्वाच्या धार्मिक स्थळांना जोडणारा प्रमुख मार्ग आहे. या मार्गावर मोठ्या प्रमाणात जड वाहनांची तसेच भाविक व नागरिकांची वर्दळ असते. सद्यस्थितीत सदर रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झालेली असून नागरिकांना पर्यायी मार्गांचा वापर करून दूरवरून प्रवास |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | करावा लागत आहे. त्यामुळे नागरिकांचा वेळ व आर्थिक खर्च मोठ्या प्रमाणात वाढत आहे. तसेच वाहतुकीच्या दृष्टीनेही अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे लोहगाव–निरगुडी या इतर जिल्हा मार्ग क्र. १२६ चा तातडीने विकास व सुधारणा करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १३ मार्च, २०२६**

**डॉ. विलास आठवले,**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) ग्रामविकास विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई